# फळ व धान्य महोत्सव योजना

## लाभार्थी :-

राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्या, कृषि मालाच्या विपणनासाठी स्थापीत असलेल्या सहकारी संस्था, शासकीय विभाग, उत्पादकांच्या सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या व पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट आणि संस्था नोंदणी अधिनियम, १८६० खाली नोंदणी झालेल्या संस्था.

## अटी व शर्ती :-

१. महोत्सवाचा कालावधी हा किमान ५ (पाच) दिवसांचा असावा.

२. महोत्सवास प्रतिस्टॉल रु.२,०००/- याप्रमाणे अर्थसहाय्य देय राहील.

३. महोत्सवामध्ये किमान १० व कमाल ५० स्टॉलसाठी अर्थसहाय्य देय राहील.

४. महोत्सव आयोजनासाठी लाभार्थीस एका आर्थीक वर्षात एकदाच अनुदान देय राहील.

५. महोत्सव आयोजनापुर्वी कृषि पणन मंडळाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

६. महोत्सवाच्या प्रचार व प्रसिध्दीमध्ये उदा., बॅनर्स, जाहिरात, बातम्या, बॅकड्रॉप, हँण्ड बिल्स, इ. मध्ये महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचा सहप्रायोजक म्हणून नामोल्लेख करणे आयोजकांवर बंधनकारक राहील.

७. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळास महोत्सवामध्ये स्टॉल घ्यावयाचा झाल्यास त्यासाठी आवश्यक स्टॉलची मोफत उपलब्धता करुन देणे आयोजकांवर बंधनकारक राहील.

८. महोत्सवाचा अहवाल आणि काही निवडक फोटो महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या कृषि पणन मित्र या मासिकामध्ये प्रकाशित करण्यासाठी सादर करणे आवश्यक राहील.

९. महोत्सव अनुदानासाठीचा परीपुर्ण प्रस्ताव महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या विभागीय कार्यालयाच्या शिफारशीसह सादर करणे आवश्यक राहील.

१०. नमूद सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र रु.१००/- च्या स्टँप पेपरवर लिहून देणे बंधनकारक आहे.

११. राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांना एका आर्थिक वर्षात जास्तीत जास्त पाच वेळा महोत्सवाचे आयोजन करण्यास तसेच सर्व महोत्सवांचे मिळुन ५० स्टॉल्ससाठी (प्रति महोत्सव कमीत कमी १० स्टॉल्स) प्रतिस्टॉल रु.२०००/- प्रमाणे कमाल अनुदान रु.१/- लाख असेल.